पनवेल :

खारघर येथील नियोजित स्कायवॉक त्वरित सुरू करा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी करीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे ते खारघर या सायन–पनवेल महामार्गाची अधिकाऱ्यांसमवेत मंगळवारी (दि. १७) पाहणी केली त्यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना रखडलेल्या स्कायवॉक बाबत जाब विचारला.

दोन वेळा भूमिपूजन होऊनही सायनपनवेल महामार्गावरील खारघर येथील नियोजित स्कायवॉकचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. त्या ऐवजी येथे टोल नाका उभारण्याची घाई सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या या दणक्याने सार्वजनिक बांधकाम विभाग हादरले असुन ५ जुलैपर्यंत स्कायवॉकचे काम पूर्ण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यापूर्वीही दोन वेळा आश्वासने दिली होती, त्याचे काय? असा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विचारताच अधिकारी निरूत्तर झाले.

सुमारे १२२० कोटी रूपये खर्च करून सायन–पनवेल महामार्गाचे रूंदीकरण आणि मजबुतीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. जनतेच्या आवश्यकतेच्या कामांमध्ये गतिमानता व तत्परता न दाखवता ठेकेदार स्वतःच्या फायद्याची कामे घाईघाईने पूर्ण करून टोल वसुली लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्नशिल आहेत.

पादचारी पूल, नाल्याचे काम, स्कायवॉकसारख्या अतिशय महत्वाच्या बाबींच्या उभारणीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. ही कामे प्राधान्याने पूर्ण करा, अशी सूचना माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली.

आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्कायवॉक उभारणीचे काम ५ जुलैपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता दिलीप साळुंखे आणि कार्यकारी अभियंता रमेश आगवणे यांना प्रत्यक्ष रस्त्याच्या पाहणी केल्यावर समक्ष दिल्या. या ठिकाणी स्कायवॉकचे काम पूर्ण होईपर्यंत सुरक्षा रक्षक व वाहतूक पोलीसांची नियुक्ती गरजेची आहे.

स्पॅगेटीच्या नागरिकांना रस्ता ओलांडताना जीव धोक्यात घालावा लागतो याचे भान ठेवा आणि जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. ५ जुलैपर्यंत काम पूर्ण न केल्यास आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा, आमदारप्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना दिला.

बांधकाम विभागाचे उप अभियंता हेमंत जगताप, जे. डी. शिंदे, सायन–पनवेल टोलवेजचे उपव्यवस्थापक शंकर शिंदे, खारघर शहर काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुनील सावर्डेकर, नाना घरत, ॲड. जे. पी. खरगे, नाना पाटील, यांसह काँग्रेस कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहा महिन्यांत ३६ लोक या ठिकाणी मृत्यूमुखी पडल्याची नोंद माझ्याकडे आहे. येथे स्कायवॉक झाल्याने आमच्याही सोयीचे होईल.स्कायवॉकसाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली मागणी रास्त आहे, अशी प्रतिक्रिया नवी मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त शेषराव सुर्यवंशी यांनी दिली आहे.